# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)

प्रथम खबर अहवाल

(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** जालना **P.S.(ठाणे):** पारध

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0033 **Year (वर्ष):** 2025

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 24/02/2025 23:03

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7(a) |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** सोमवार **Date From (दिनांक पासून):** 24/02/2025

**Time Period (कालावधी):** पहर 5 **Date To ( दिनांक पर्यंत):** 24/02/2025

**Time From (वेळेपासून):** 12:43 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 13:11 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 24/02/2025 **Time (वेळ):** 22:44 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 020

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 24/02/2025 22:44 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

पूर्व, 1 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** तलाठी सजा कार्यालय पारध बु

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): मयुर सुनिलचंद्र लोखंडे

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1998

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| **S.No.** (अ.क्र.) | **ID Type** (ओळखपत्राचा प्रकार) | **ID Number** (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| **S.No.** (अ.क्र.) | **Address Type** (पत्याचा प्रकार) | **Address** (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | रापारध बु ताभोकरदन,पारध,जालना,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | रापारध बु ताभोकरदन,पारध,जालना,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-8668548533

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| **S.No.** (अ.क्र.) | **Name** (नाव) | **Alias** (उर्फनाव) | **Relative's Name** (नातेवाईकाचे नाव) | **Present Address** (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | श्रीकष्ण मधुकर कुलकर्णी | | | 1. ग्राम महसुल अधिकारी सजा पारध ,राहटेल मालक बिअरबार च्यावरती ,जाफ्राबाद रोड भोकरदन जिजालना ,पारध, जालना,महाराष्ट्र,भारत |
| 2 | कष्णा ऊर्फ बंडु गणेश दळवी | | | 1. रायेवता ताजाफ्राबाद जिजालना, पारध,जालना,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | जप्त माल 2500/ रुपये लाचेची रक्कम न्थ्रासिन पावडर लागलेली | 2,500.00 |

**10 Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

2,500.00

**11. Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12. First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद

दिनांक 24.02.2025.

मी मयुर सुनिलचंद्र लोखंडे वय 27 वर्ष व्यवसाय शेती व शिक्षण रा.पारध बु ता.भोकरदन जि.जालना मो.नं. 8668548533 ईमेल आयडी- lokhandemayur1997@gmail.com.

समक्ष ॲन्टी करप्शन ब्युरो जालना येथे हजर येवून फिर्याद देतो की, मी दिनांक 24.02.2025 रोजी ॲन्टी करप्शन ब्युरो जालना येथे हजर राहुन तक्रार दिली होती की, मी वरील ठिकाणी आई वडिलांसह एकत्र राहत असुन सध्या शेती करुन कुटुंबाचा उदरनिर्वाह करतो. आमची पारध बु येथे शेत गट नंबर 493 व 490 मध्ये शेती असुन ती माझ्या आई वडिलांच्या नावे आहे.दिनांक 27.01.2025 रोजी आम्ही मौजे पारध बु येथील शेत गट नंबर 490 मधील निर्मलाबाई भगवान तबडे व इतर यांच्या नावे असलेली 11 आर शेत जमीन 1,70,000/-रुपया मध्ये विकत घेतली असुन सदरची जमीन ही माझी आई अरुणाबाई सुनिल लोखंडे यांच्या नावे खरेदीखत करुन घेतलेले आहे.

त्यानंतर मी दिनांक 20.02.2025 रोजी मौजे पारध बु येथील शेत गट नंबर 490 मधील 11 आर शेत जमीन खरेदीखता नुसार फेरफार नोंद झाली किंवा नाही याची माहिती घेण्यासाठी पारध बु तलाठी सजा कार्यालयात जावुन तलाठी कुलकर्णी यांची भेट घेतली. त्यावेळी तलाठी कुलकर्णी यांनी माझ्या आईच्या नावाने फेरफार नोंद करण्यासाठी 3,000/-रुपयाची मागणी केली असता मी त्यांना नाईलाजाने होकार दिला. त्यानंतर मी गावात जावुन विचारपुस केली असता फेरफार नोंद करण्यासाठी कोणतीही शासकिय फी लागत नसल्याचे मला समजले. मला तलाठी कुलकर्णी यांनी मागणी केलेले पैसे हे लाच असल्याची माझी खात्री झाल्याने मी आज रोजी ॲन्टी करप्शन ब्युरो जालना येथे तक्रार देण्यासाठी आलो आहे.

मला तलाठी कुलकर्णी यांना लाच देण्याची इच्छा नाही. त्यांची व माझी वैयक्तिक दुश्मनी नाही किंवा त्यांचा माझा देण्या घेण्याचा कोणताही आर्थिक व्यवहार नाही. मी जर त्यांना लाच दिली नाही तर ते माझ्या आईच्या नावाने फेरफार नोंद करणार नाही.

तलाठी कुलकर्णी हे दर आठवडयाच्या सोमवारी व गुरुवारी कामकाजा करीता तलाठी सजा पारध बु ता.भोकरदन येथे उपस्थित राहतात. त्यामुळे मी आज दिनांक 24.02.2025 रोजी तलाठी सजा पारध बु येथे जावुन त्यांची भेट घेणार आहे. त्यावेळी त्यांनी मला लाचेची मागणी करुन स्वत: किंवा इतरां मार्फत स्विकारल्यास कायदेशीर कारवाई करावी ही विनंती अशा मजकुराची तक्रार दिली होती. माझ्या दिलेल्या तक्रारी वरुन ॲन्टी करप्शन ब्युरो जालना येथील पोलीस उप अधीक्षक श्री.बाळु जाधवर यांनी दोन शासकिय पंचाना बोलावुन माझी व पंचाची ओळख करुन देवुन माझी तक्रार त्यांना दाखविली. त्यावर मी, पंचानी व पोलीस उप अधीक्षक श्री.जाधवर यांनी सह्या केल्या. मी तलाठी कुलकर्णी यांचे विरुध्द दिलेली तक्रार खरी आहे काय ? ते माझ्या कडे लाच मागतात काय ? याची खात्री करण्यासाठी पोलीस उप अधीक्षक श्री.जाधवर, दोन्ही पंच व सापळा पथक असे सरकारी वाहनाने व मी माझ्या मोटार सायकलने रवाना होऊन पारध ते धाड जाणाऱ्या रोडच्या बाजुला पारध बु शिवारात सुरक्षित ठिकाणी थांबलो. त्यानंतर मला, दोन्ही पंचाना व सापळा पथकास पोलीस उप अधीक्षक श्री.बाळु जाधवर यांनी सुचना देवुन पोलीस अंमलदार श्री.चेके यांनी व्हाईस रेकॉर्डर मशीन मध्ये एक नविन मेमरी कार्ड टाकुन त्यामध्ये पूर्वीचे कोणतेही संभाषण

नसल्याची खात्री करुन दिली. त्यानंतर व्हाईस रेकॉर्डर मशीन सुरु करुन त्यामध्ये पोलीस उप अधीक्षक श्री.बाळु जाधवर, दोन्ही पंचाचे व माझे वक्तव्य घेऊन व्हाईस रेकॉर्डर मशीन एका कापडी पिशवीत टाकुन माझ्या शर्टाच्या आतुन गळयात अडकवण्यात आली. त्यानंतर मला पंच क्र.1 कृष्णा कापरे यांचे सोबत तलाठी कुलकर्णी यांना भेटण्यासाठी तलाठी सजा पारध बु येथे पाठविण्यात आले. मी व पंच क्र.1 कापरे असे आम्ही माझ्या कडील मोटार सायकलने तलाठी सजा पारध बु येथे गेलो. त्यावेळी कार्यालयात तलाठी कुलकर्णी यांच्या खुर्चीवर बसलेला खाजगी इसम कृष्णा दळवी यांची भेट घेतली. तेंव्हा आमची कामा संबधी चर्चा झाली. चर्चे दरम्यान खाजगी इसम कृष्णा दळवी याने मला खरेदीखत कागदपत्राच्या झेरॉक्स आणुन देण्यास सांगितल्याने मी व पंच क्र.1 कापरे असे आम्ही माझ्या कडील मोटार सायकलने झेरॉक्सच्या दुकानात जावुन मुळ खरेदीखताच्या झेरॉक्स काढुन पुन्हा तलाठी सजा पारध बु येथे गेलो. त्यावेळी खाजगी इसम कृष्णा दळवी याने माझ्या कडुन खरेदीखत कागदपत्राच्या झेरॉक्स घेतल्या. तेंव्हा आमची कामा संबधी बरीच चर्चा झाली. चर्चे दरम्यान खाजगी इसम कृष्णा दळवी ते आण किती असे म्हणाले असता मी किती असे म्हणालो. त्यावर दळवी तीन तीन असे म्हणाले असता मी कही कमी करा सर असे म्हणालो. त्यावर दळवी चार सांगितले असते तीन घेतले असते असे म्हणाले असता मी तीन हजार जरा जास्त होते ना हो असे म्हणालो. त्यावर दळवी साहेबाला भेट साहेबाला भेट असे म्हणाले असता मी कोणते असे म्हणालो असता त्यावर दळवी टोपीवाले साहेब असे म्हणाल्याने मी व पंच क्र.1 कापरे असे आम्ही कार्यालयाच्या बाहेर येऊन तेथे डोक्यात टोपी घालुन उभे असलेले तलाठी कुलकर्णी यांची भेट घेतली. तेंव्हा आमची कामा संबधी बरीच चर्चा झाली. त्यावेळी मी याच्यात काही कमी जास्त असे म्हणालो असता तलाठी कुलकर्णी देऊन टाका पंचवीशे आ, पंचवीशे देऊन टाका त्याचे जवळ, बस असे म्हणाले. त्यावर मी तुम्ही एकदा बोला त्याहयला असे म्हणालो असता तलाठी कुलकर्णी, मी व पंच क्र.1 कापरे असे आम्ही परत कार्यालयात गेलो. तेंव्हा तलाठी कुलकर्णी अय, घेऊन टाक असे म्हणाले असता मी कॅश आणुन देतो त्याहयला असे म्हणुन मी व पंच क्र.1 कापरे असे आम्ही तेथुन निघुन पारध ते धाड जाणाऱ्या रोडच्या बाजुला पारध बु शिवारात सुरक्षित ठिकाणी परत आलो. तेव्हा माझे जवळील व्हाईस रेकॉर्डर मशीन पोलीस उपअधीक्षक श्री.जाधवर यांचे सांगणे वरुन पोलीस अंमलदार श्री.चेके यांनी बंद केली. व्हाईस रेकॉर्डर मध्ये रेकॉर्ड झालेले संभाषण पोलीस उपअधीक्षक श्री.जाधवर यांनी ऐकले. त्यामध्ये खाजगी इसम कृष्णा दळवी याने मौजे पारध बु येथील शेत गट नंबर 490 मधील 11 आर शेत जमीन खरेदीखता नुसार फेरफार नोंदच्या कामासाठी 3000/-रुपयाची मागणी करुन तडजोड अंती तलाठी कुलकर्णी यांनी 2500/-रुपये लाचेची मागणी करुन लाचेची रक्कम खाजगी इसम कृष्णा दळवी याच्या कडे देण्यास सांगितल्याने खाजगी इसम कृष्णा दळवी हा लाचेची रक्कम स्विकारणार असल्याचे निष्पन्न झाले. त्याबाबतचा सापळा पथकाने तसा सविस्तर लाच मागणी पडताळणी पंचनामा केला.

त्यावरुन दिनांक 24.02.2025 रोजी खाजगी इसम कृष्णा दळवी यांचे विरुध्द तलाठी सजा पारध बु येथे सापळा लावण्याचे ठरविले. त्यानंतर पोलीस उप अधीक्षक श्री.जाधवर यांचे सूचने वरुन सरकारी वाहनात पोलीस अंमलदार श्री.बिनोरकर यांनी अंथ्रासीन पावडरची व अल्ट्राव्हायलेट बॅटरीची माहीती देवुन मला व पंचांना त्याचे प्रात्यक्षिक दाखविण्यात आले. खाजगी इसम कृष्णा दळवी यांना लाच म्हणुन देण्यासाठी माझ्या स्वकष्टांचे पाचशे रुपये दराच्या 05 नोटांचे नंबर वर्णन लिहुन घेऊन 05 नोटा एकुण 2500/- रुपये रक्कमेला ॲन्थ्रासीन पावडर लावली. सदरील ॲन्थ्रासीन पावडर लावलेले नोटा माझ्या पॅन्टचे उजव्या खिशात ठेवल्या. पोलीस उप अधीक्षक श्री.जाधवर यांनी मला व पंचाना सविस्तर सुचना देवुन खाजगी इसम कृष्णा दळवी यांनी लाच स्विकारल्या नंतर त्यांच्या कार्यालयाच्या बाहेर येऊन डाव्या हाताने उजव्या हाताची शर्टची बाही वर करुन इशारा करणे बाबत मला सुचना दिली. तसेच सापळा पथकास त्यांचे काम समजावुन सांगुन सुचना देण्यात आल्या. पोलीस अंमलदार श्री. बिनोरकर यांना सापळा पथकातुन वगळुन सरकारी वाहनात थांबण्याची सुचना दिली. त्याबाबतचा सापळा पथकाने सविस्तर सापळापुर्व पंचनामा केला.

त्यानंतर पोलीस अंमलदार श्री.चेके यांनी व्हाईस रेकॉर्डर मशीन सुरु करुन एका कापडी पिशवीत टाकुन माझ्या शर्टाच्या आतुन गळयात अडकवुन दिली. मला व पंच क्र.1 कापरे यांना खाजगी इसम कृष्णा दळवी यांना भेटण्यासाठी तलाठी सजा पारध बु येथे पाठविले. मी व पंच क्र.1 कापरे असे आम्ही माझ्या मोटार सायकलने तलाठी सजा पारध बु कार्यालयाच्या आवारात जावुन थांबलो. त्यावेळी माझ्या पाठीमागे पोलीस उप अधीक्षक श्री. जाधवर हे त्यांचे सापळा पथक व पंच क्र.2 वाघमारे यांचे सह तलाठी सजा पारध बु कार्यालयाच्या जवळ आले व एकमेकांना दिसतील अशा रितीने कार्यालयाच्या आजु बाजुला सापळा लावून थांबले.

त्यानंतर मी व पंच क्र.1 कापरे असे आम्ही पायी चालत कार्यालयात जावुन खाजगी इसम कृष्णा दळवी यांची भेट घेतली. त्यावेळी खाजगी इसम कृष्णा दळवी याने पंच क्र.1 कापरे यांच्या समक्ष उजव्या हाताचा अंगठा तर्जनीवर खासुन ईशारा केला असता मी माझ्या उजव्या हाताने पॅन्टच्या उजव्या खिश्यातुन ॲन्थ्रासिन पावडर लावलेले

2500/- रुपये काढुन खाजगी इसम कृष्णा दळवी हयांचे समोर घरले असता त्यांनी त्यांच्या उजव्या हाताने लाचेची रक्कम घेवून त्यांच्या अंगातील पॅन्टच्या समोरील उजव्या बाजुच्या खिश्यात ठेवुन ठिक हे असे म्हणाले. त्यानंतर थोडया वेळाने मी ठरल्या प्रमाणे लाचेची रक्कम स्विकारल्याचा पूर्व नियोजित इशारा केला. ती वेळ अंदाजे दुपारी पावणे एक वाजेची होती. त्यानंतर सापळा पथक सक्रीय होवून पंच क्रं.2 वाघमारे यांचे सह त्या ठिकाणी आले. पोलीस उप अधीक्षक श्री.जाधवर यांच्या सूचने वरुन पोलीस अंमलदार श्री.चेके यांनी माझ्या कडील व्हाईस रेकॉर्डर मशीन ताब्यात घेऊन बंद केली. त्यानंतर पोलीस उप अधीक्षक श्री.जाधवर यांनी पंच क्र.1 कापरे यांना लाचेची रक्कम कोणी मागितली व कोणी स्विकारली असे विचारले असता पंच क्र.1 कापरे यांनी तेथे हजर असलेल्या एका इसमा कडे अंगुली निर्देश करुन हेच खाजगी इसम कृष्णा दळवी असुन याने तक्रारदार यांच्या कडुन उजव्या हाताने लाचेची रक्कम घेवून त्यांच्या अंगातील पॅन्टच्या समोरील उजव्या बाजुच्या खिश्यात ठेवली आहे असे सांगितल्याने कृष्णा दळवी यास पंचा समक्ष लाचेच्या रक्कमेसह जागेवर पकडले. त्यानंतर पोलीस उप अधीक्षक श्री.जाधवर यांनी त्यांची, पंचाची व सापळा पथकाची ओळख करुन दिली. त्यानंतर कृष्णा दळवी यास त्यांचे नाव गाव पत्ता विचारले असता त्यांनी त्यांचे नाव कृष्णा ऊर्फ बंडु गणेश दळवी वय 36 वर्षे व्यवसाय मजुरी रा.येवता ता.जाफ्राबाद जि. जालना असे सांगीतले. त्यावेळी खाजगी इसम कृष्णा दळवी यास स्विकारलेली लाचेची रक्कम कोठे ठेवली असे विचारले असता त्यांनी त्यांच्या अंगातील पॅन्टच्या समोरील उजव्या बाजुच्या खिश्यात ठेवल्याचे सांगितल्याने पंच क्र. 2 वाघमारे यांनी त्यांच्या पॅन्टच्या समोरील उजव्या बाजुच्या खिश्या मधुन 2500/- रुपये काढुन घेवुन सदर नोटांचे क्रमांक व सापळापुर्व पंचनाम्यातील नोटांचे क्रमांक एकच असल्याची खात्री केली. त्यानंतर तलाठी सजा कार्यालय पारध बु मधील लाईट खिडक्या बंद करुन काळया कपडयाच्या सहायाने अंधार करुन पोलीस उप अधीक्षक श्री. जाधवर यांनी अल्ट्राव्हायलेट बॅटरीच्या सहायाने खाजगी इसम कृष्णा दळवी यांचे दोन्ही हात, अंगातील पॅन्ट व लाचेच्या नोटा चेक केल्या असता खाजगी इसम कृष्णा दळवी यांचे उजव्या हाताचे बोटावर, अंगातील पॅन्टच्या समोरील उजव्या बाजुच्या खिश्याच्या तोंडावर व आतमध्ये तसेच लाचेच्या नोटावर ठिक ठिकाणी हिरवट रंगाची चकाकी दिसुन आली. त्यानंतर सदर 2500/- रुपये लाचेची रक्कम पंचा समक्ष जागीच लाख सिल मोहर करुन जप्त करण्यात आली. तसेच माझे हात व अंगावरील कपडे अल्ट्राव्हायलेट बॅटरीच्या सहायाने चेक केले असता माझे उजव्या हाताचे बोटावर व अंगातील पॅन्टच्या उजव्या बाजुच्या समोरील खिश्याच्या तोंडावर व आतमध्ये ठिक ठिकाणी हिरवट रंगाची चकाकी दिसुन आली. त्यानंतर खाजगी इसम कृष्णा दळवी याच्या कडुन माझ्या कामा संबंधीचे कागदपत्र जप्त केले. त्यावेळी खाजगी इसम कृष्णा दळवी यास पोलीस उप अधीक्षक श्री.जाधवर यांनी तलाठी कुलकर्णी यांचे नाव, गाव व कोठे आहे याबाबत विचारणा केली असता कृष्णा दळवी यांने तलाठी कुलकर्णी यांचे नाव श्रीकृष्ण मधुकर (सिसिटीएनएस मध्ये शब्द मर्यादा असल्याने पुर्ण फिर्याद बसत नसल्याने यासोबत जोडुन सादर करण्यात येत आहे )

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2. (**केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.**)**

(1) **Registered the case and took up the investigation: (**प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले**):**

Santosh Dayanand Mane(I (Inspector)) / API **or (**किंवा**)**

(2) **Directed (Name of I.O.) (**तपास अधिका-याचे नाव**):**

**Rank (**पद**):** **No.(**क्र.**):**

**to take up the Investigation (**ला तपास करण्याचे अधिकार दिले**) or (**किंवा**)**

(3) **Refused investigation due to (**ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला**):**

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): Santosh Dayanand I

**Rank**(पद): I (Inspector)

**No.**(सं.): API

**Attachment to item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र): Physical features, deformities and other details of the ( If known / seen )(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्ट्ये, व्यंग आणि इतर तपशील))**

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीक/ वर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (उंची(सें. मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |
| 2 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा / बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्य ा खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)